दैनिक
# महा मेट्रो

www.mahametronews.in

वर्ष ४ थे : अंक : १६ पुणे, शुक्रवार, ५ सप्टेंबर २०२५ | पाने : ४ किंमत : ३.००

RNI NO.MAHMAR2022/87390

VOL NO.04. ISSUE : 16 Pune, Friday, 5 September 2025 | Pages : 4 PRICE : 3.00


# भटक्या विमुक्तांचा समावेश अनुसुचित जमातींमध्ये (एस. टी) झालाच पाहिजे : पद्मश्री लक्ष्मण माने

## १० सप्टेंबर पासून आझाद मैदानावर उपोषणास बसणार; भटक्या विमुक्तांच्या ४२ जमातीचे नेते कार्यकर्ते राहणार उपस्थितीत

**पुणे । प्रतिनिधी**

हैद्राबाद गॅझेटप्रमाणे व सातारा गॅझेटप्रमाणे या सर्व भटक्या विमुक्तांच्या ४२ जमाती आदिवासी ठरतात. हैद्राबादमध्ये, निजामसंस्थानामध्ये आजही या जमाती अनुसुचित जाती व जमातीमध्ये आहेत. शेजारच्या कर्नाटकामध्ये भटक्या विमुक्त जमाती अनुसुचित जातीत आहेत. तेलंगणा हैद्राबादमध्ये ते अनुसुचित जमातीमध्ये

आहेत. मध्यप्रदेशमध्ये त्या अनुसुचित जातीत आहेत. कैकाडी आणि पारधी या दोन जमाती विदर्भामध्ये अनुसुचित जाती आणि जमातीमध्ये आहेत. तर उरलेल्या महाराष्ट्रामध्ये त्या गुन्हेगार जमातीमध्ये आहेत. त्यामुळे एक देश एक जमाती प्रमाणे भटक्या विमुक्तांचा समावेश अनुसुचित जमातींमध्ये (एस.टी) झालाच पाहिजे. या मागणीसाठी येत्या १० सप्टेंबर पासून आझाद मैदानावर उपोषणास बसणार असल्याचे भटक्या विमुक्त संघटनेचे प्रदेश अध्यक्ष पदमश्री लक्ष्मण माने यांनी पत्रकार परिषेदेत सांगितले.



माने म्हणाले , ''भटक्या विमुक्त जमाती या आदिवासी आहेत. याबददल केंद्र सरकार, राज्य सरकार या सगळ्यांना मान्य आहे. या गावगाड्यातल्या जाती नाहीत. गावातल्या जाती नाहीत. अगदी गावकुसाबाहेरच्या सुध्दा जाती नाहीत. या लांब माळरानावर , रानावनामध्ये राहणाऱ्या भटक्या जमाती आहेत. यांना कोणतेही गाव नाही. त्यामुळे ते बलुतेदार असण्याचा प्रश्नच नाही. तरीही त्यांचा समावेश ओबीसींमध्ये कसा होऊ शकतो. त्यामुळे हैद्राबाद गॅझेटिअर नुसार मराठयांना कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भात राज्य सरकारने निर्णय घेतला आहे. याच हैद्राबाद गॅझेटिअर नुसार हैद्राबादमध्ये, निजामसंस्थानामध्ये आजही या जमाती अनुसुचित जाती व जमातीमध्ये आहेत. त्यामुळे सरकारने सर्व भटक्या विमुक्तांच्या ४२ जमाती आदिवासी ठरतात त्यांना आदिवासी जमाती मध्ये समावेश करावा.

साडे पाच टक्के जागा या आमच्या संवर्गाला मिळालेल्या आहेत. तेव्हा नव्याने काही दयायचे नाही. कोणाचे काढून दयायचे नाही किंवा कुठल्यातरी यादीत घालायचे नाही तर फक्त यांना आदिवासींचे स्टेटस दयायचे आहे. आणि भारतीय राज्यघटनेचे संरक्षण दयायचे आहे ही आतिशय न्यायाची मागणी आहे. कोणावरही अन्याय करणारी नाही. जेवढी आमची मागणी आहे तेवढेच दया. हे घेतल्याशिवाय आम्ही थांबणार नाही. यासाठी भटक्या विमुक्त जमातीतील सर्व संघटना, पदाधिकारी ही लढाई आमचा जीआर निघेपर्यंत आम्ही लढत राहू असे माने यांनी सांगितले.

भटक्या विमुक्त जमाती या आदिवासी आहेत. याबददल केंद्र सरकार, राज्य सरकार या सगळ्यांना मान्य आहे. या गावगाड्यातल्या जाती नाहीत. गावातल्या जाती नाहीत. अगदी गावकुसाबाहेरच्या सुध्दा जाती नाहीत. या लांब हागणदारीमध्ये, माळरानावर रानावनामध्ये राहणाऱ्या भटक्या जमाती आहेत. यांना कोणतेही गाव नाही. त्यामुळे ते बलुतेदार असण्याचा प्रश्नच नाही. तरीही त्यांचा समावेश ओबीसींमध्ये कसा होऊ शकतो. असा प्रश्न माने यांनी

पान ३ वर..

### कुणबी जातीस कापो या नावाने ओळखले जात

**हैद्राबाद गॅझेटिअर मधील नोंदी विचारात घेवून मराठा समाजाच्या व्यक्तींना कुणबी किंवा मराठा कुणबी किंवा कुणबी मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपध्दती विहीत करण्याबाबत सदरचा शासन आदेश आहे. हैद्राबाद गॅझेट, सातारा गॅझेट व बॉम्बे गॅझेट या सर्व गॅझेटचा वापर करुन न्यायमुर्ती संदीप शिंदे . समितीने तत्कालीन निजाम सरकारमध्ये कुणबी जातीस कापो या नावाने ओळखले जाई. या गॅझेटिअर मध्ये (१९२१ व सन १९३१) कुणबी कापो अशा नोंदी आहेत. या पुर्वी महाराष्ट्र अनुसुचित जाती अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांना जाती प्रमाणपत्र देण्यासाठी व जात पडताळणीसाठी अधिनियम २००० च्या कलम १८ च्या पोटकलम १ मध्ये आणि नियम २०१२ च्या नियम ४ मधील उपनियम २ मधील खंड च मध्ये च नंतर विविध अभिलेखांचा समावेश करण्याकरता अधिसुचना प्रसिध्द करण्यात आली आहे.**

---

## महत्वाचे...



### मिले सूर मेरा तुम्हारा !!!

**पुणे । प्रतिनिधी**

नव्वद च्या दशकात दूरदर्शन वर रविवारी सकाळी आवर्जून लागणारे हे गाणं ! त्या मध्ये भारतातील विविध राज्ये तेथील वेशभूषेतील लोक हे गाणं आपल्या मातृभाषेत गात असत. ह्याच धर्तीवर आधारित पार्क लँडम ार्क सोसायटी बिबवेवाडी यामध्ये कला दर्शन ग्रुप च्या ८८ कलाकारांनी सोसायटीच्या सार्वजनिक गणेशउत्सव निमित्त मिले सूर मेरा तुम्हारा कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमात विविध राज्यातील संस्कृतीची माहिती आणि सबत त्या राज्यातील नृत्य सादर केले. विशेष म्हणजे सर्व वयोगटातील कलाकार सहभागी झाले होते. कार्यक्रमाची मूळ संकल्पना आणि कला दर्शन ग्रुप च्या संस्थापिका वैशाली विठ्ठल गलगली ह्यांची होती. कलाकारांची निवड, तयारी ,कार्यक्रम सादरीकरण ह्या साठी त्यांना योगिता देवघरकर आणि गौरी शित्रे यांनी मदत गेली. कार्यक्रमासाठी प्रत्यक्षरित्या मदत करणाऱ्याचा गुलाबाचे रोपटे देऊन सत्कार केला. विविधतेत एकता असा विशेष संदेश येणाऱ्या पिढीला दिला गेला. सोसायटीतील उपस्थित सर्वानी कला दर्शन ग्रुप चे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाची सांगता लमधडे यांनी केली.



### रथातून निघणार दगडूशेठ हलवाई गणपतीची मिरवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

सध्या सर्वत्र गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून, आता येत्या ६ तारखेला विसर्जन मिरवणुकीला सुरुवात होणार आहे. यंदा श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पाची विसर्जन मिरवणूक ही श्री गणनायक रथामधून निघणार आहे. या रथात गणपती बाप्पा विराजमान होणार असून, आकर्षक विद्युत रोषणाईनं हा रथ उजळून निघणार आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने उत्सवाच्या १३३ व्या वर्षानिमित्त आयोजित गणेशोत्सवाची सांगता मिरवणूक मोठ्या दिमाखात निघणार आहे.



### पुण्यात ॲपलचं पहिलं पर्यावरणपूरक स्टोअर सुरू

**पुणे । प्रतिनिधी**

ॲपलच्या जगभरातील चाहत्यांसाठी आनंदाची बातमी आहे. पुण्यातील कोरेगाव पार्क येथील कोपा मॉलमध्ये ॲपलच्या नव्या कोऱ्या स्टोअरचं आज थाटामाटात उद्घाटन झालंय. सकाळपासूनच ॲपलप्रेमींनी मॉलबाहेर प्रचंड गर्दी केली होती. स्टोअरचे दरवाजे उघडताच चाहत्यांनी जल्लोष करत आनंद व्यक्त केला. सकाळी ८ वाजल्यापासून कोरेगाव पार्क परिसरात ॲपल चाहत्यांनी रांगा लावल्या होत्या. शाळकरी मुलांपासून ते तरुण-तरुणींपर्यंत सर्वांनी या स्टोअरमधील उत्पादनांचा अनुभव घेतला.

---

# भुजबळांना मी आश्वस्त केलंय; अखेर मुख्यमंत्री फडणवीसांची स्पष्टोक्ती

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य करत राज्य शासनाने हैदराबाद गॅझेटियरवर आधारित शासन निर्णय (ऋठ) जारी केला आहे. या निर्णयानंतर मराठा समाजाने आपले आंदोलन मागे घेतले असून, मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सोडल्यानंतर आझाद मैदानावर जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. त्यानंतर राज्यभरातील ओबीसी नेत्यांमध्ये नाराजी पाहायला मिळत होती. मात्र, आता शासनाने काढलेला जीआर हा सरसकट नसून केवळ पात्र व पुरावे असणाऱ्यांसाठी आहे. त्यामुळे ओबीसी समाजावर याचा कोणताही परिणाम होणार नाही.

असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधान केलं आहे. त्यामुळे सरसकट मराठा समाजाला आरक्षण मिळणार नसल्याचं स्पष्ट होत आहे. दुसरीकडे, शासनाच्या या निर्णयामुळे ओबीसी समाजात नाराजीचा सूर उमटला आहे. काही ओबीसी नेत्यांचा आरोप



आहे की, मराठा समाजाला ओबीसी आरक्षणातूनच सवलती दिल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर ओबीसी नेते आणि राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीला गैरहजर राहत आपला विरोध व्यक्त केला असल्याचं बोललं जात होत.

यावर स्पष्टीकरण देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, छगन भुजबळ नाराज नाहीत, त्यांच्या सोबत माझी चर्चा झाली आहे. मी त्यांना आश्वस्त केलं आहे की हा जीआर सरसकट नसून केवळ पात्र व पुरावे असणाऱ्यांसाठी हा जीआर काढण्यात आला आहे. त्यामुळे ओबीसी समाजावर याचा कोणताही परिणाम होणार नाही.

फडणवीस पुढे म्हणाले, मराठवाड्यात ब्रिटिश नव्हे तर निझामाचे राज्य होते. त्यामुळे तिथे ब्रिटिशकालीन पुरावे उपलब्ध नाहीत. त्यामुळे हैदराबादमधील गॅझेटियरमधून मिळालेल्या ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे योग्य त्या लाभार्थ्यांना ओळखून हा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये कोणालाही खोटेपणा करता येणार नाही. ओबीसी समाजातील काही नेत्यांच्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सौम्य पण ठाम भूमिका मांडली. काही लोक जाणूनबुजून गैरसमज

पान ३ वर..

---

# बाणेर परिसरात मुळशी पॅटर्नच्या स्टाईलने एका तरुणावर कोयत्याने वार

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या काही काळापासून पुणे शहरासह आसपासच्या भागात कोयता गँगच्या अनेक घटना घडल्या आहेत. गणेश उत्सवाच्या काळात शहरात कायदा सुव्यवस्था राहावी, यासाठी पुणे पोलिसांनी सराईत गुन्हेगारांवर कारवाई केली होती.

पण आता पुणे शहरात एकीकडे गणेशोत्सवाचा उत्साह सुरू असताना, बाणेर परिसरात ३९;मुळशी पॅटर्न३९;च्या स्टाईलने एका तरुणावर कोयत्याने वार झाल्याची घटना समोर आली आहे. हा संपूर्ण घटनाक्रम सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. गणेश मंडळासमोरच हा थरार घडल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. जुन्या भांडणाचा राग मनात धरून चार जणांनी मिळून एका तरुणावर प्राणघातक हल्ला केला. सचिन माने असं हल्ला झालेल्या तरुणाचं नाव आहे.

या तरुणावर एकाने पाठलाग करून चार वेळा हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पण दैव बलवत्तर म्हणून की काय तरुणाने प्रत्येक वार चुकवण्याचा प्रयत्न केला. जखमी सचिनने जीवाच्या आंकाताने धावत हल्लेखोराच्या तावडीतून सुटका करून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र चवथाळलेल्या आरोपीने चार ते पाच वेळा गाठून सचिनवर हल्ला केला. या हल्ल्यात सचिन जखमी झाला. यावेळी घटनास्थळी अनेक लोक होते. मात्र कुणीही सचिनच्या मदतीला धावलं नाही. ऐन गणपती मंडळासमोर हा हल्ला झाल्याने परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून त्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाणेर येथील गणेश मंडळाजवळ काही तरुण बसले होते. त्यावेळी जुन्या भांडणावरून वाद उफाळून आला आणि चार आरोपींनी सचिन मानेवर कोयत्याने वार केले. अचानक झालेल्या या हल्ल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. हल्लेखोरांनी सचिनला शिवीगाळ करत मारहाणही केली. याप्रकरणी चार आरोपींविरोधात बाणेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत. ऐन सणासुदीच्या दिवसात घडलेल्या या घटनेमुळे कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



---

# पुणे स्टेशनवर ओणम सेलिब्रेशन २०२५ची रंगतदार सुरुवात;

## पूकलम, महाबली मिरवणूक आणि चेंदमेलमने मोहवली प्रेक्षकांची मनं






**पुणे । प्रतिनिधी**

पुणे मल्याळी फेडरेशनच्या ''ओणम सेलिब्रेशन २०२५'' ला आज, ४ सप्टेंबर २०२५ रोजी पुणे रेल्वे स्टेशन येथे सुरुवात झाली. या समारंभाचे उद्घाटन पुणे रेल्वे पोलीस अधिक्षक, आयपीएस श्रीमती. आस्वनी सानप, यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास पुणे रेल्वेचे आयआरटीएस वरिष्ठ विभागीय ऑपरेशन्स मॅनेजर डॉ. रामदास भिसे, आणि वरिष्ठ विभागीय कमर्शियल मॅनेजर श्री. ए. के. पाठक हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. या उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे पुणे रेल्वे स्टेशनच्या मुख्य प्रवेशद्वारावर लावण्यात आलेली पारंपारिक ओणम पूकलम (फुलांनी सजवलेली रांगोळी). दुसरे आकर्षण म्हणजे राजा महाबलीची ऐतिहासिक पोशाखातली भव्य मिरवणूक आणि कलाकारांच्या गटाने पारंपारिक केरळ चेंदमेलम सह काढलेली मिरवणूक. मुख्य प्रवेशद्वारावरून जाणारे बहुतेक रेल्वे प्रवासी पूकलमचे फोटो काढण्यासाठी किंवा सेल्फी घेण्यासाठी थांबले आणि सुंदर चेंदमेलम ऐकले, जे पुण्यातील गर्दीसाठी एक वेगळेच होते. पुणे मल्याळी फेडरेशनचे प्रमुख नेते जसे की श्री. जॉन टीडी, सरचिटणीस, श्रीमती. शानी नौशाद आणि श्री. एम व्ही परमेश्वरन, उपाध्यक्ष, श्री राजन आर नायर, कोषाध्यक्ष आणि युवा कल्याण नेते श्री व्ही एम कबीर, आयएनटीयूसीचे राष्ट्रीय सचिव श्री राजन के नायर, एमपीसीसीचे जनरल सेक्रेटरी श्री बाबू नायर हे देखील या उत्सवात उपस्थित होते. या कार्यक्रमात अनेक मल्याळी महिला, मुली आणि पुरुष त्यांच्या पारंपारिक ओणम पोशाखात सहभागी झाले होते.

---

# आपत्ती काळात तत्पर सेवा देण्यासाठी अग्निशामक जवानांना कोलाड येथे प्रशिक्षण

**पुणे । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे २६ जवानांचे विशेष पथक अलीकडेच कोलाड येथे फ्लूड रेस्क्यू प्रशिक्षणासाठी गेले होते. आपत्तीच्या प्रसंगी नागरिकांना तातडीने मदत करण्यासाठी अग्निशामक जवानांनी घेतलेले हे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. नैसर्गिक आपत्ती, पूरस्थितीच्या काळात जीव वाचवण्यासाठी केवळ पोहण्याचे कौशल्य पुरेसे नसते, तर योग्य तंत्र, अचूक प्रतिसाद आणि तात्काळ प्राथमिक उपचारांचीही गरज असते. या पार्श्वभूमीवर कोलाड येथील प्रशिक्षणात विविध प्रत्यक्ष सराव आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून अग्निशामक जवानांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षणादरम्यान वाहत्या पाण्यात पोहण्याच्या तंत्रांवर विशेष भर देण्यात आला. स्थिर पाण्यात पोहणे सोपे असले तरी जोरात वाहणाऱ्या प्रवाहात पोहणे अत्यंत अवघड असते. अनेकदा अशा प्रवाहात अडकलेल्या किंवा वाहून गेलेल्या नागरिकांना वाचवण्यासाठी जवानांना मोठी कसरत करावी लागते. म्हणूनच वेगाने वाहणाऱ्या प्रवाहात

पान ३ वर..

